Anekant Education Society's
Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 50 Displayed on : 27/04/2022

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील अनुसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अत्यंत महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मधील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील अनूसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. भासशि–२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण १ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई –४०००३२ दि.१७ मार्च २०२२ नुसार अनूसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा–या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०–२१ ते २०२५–२६ या कालावधीकरीता जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याबाबत.

(केंद्र हिस्सा निधी वितरण पध्दती)

१) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे – २०२१ मध्ये केंद्र शासनाने राज्य शासनसाठी निर्गमीत केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूची मधील मुद्दा क्र. ११.१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली संपूर्ण रक्कम म्हणजेच महाविद्यालयाला देय असलेले सर्व प्रकारचे ना– परतावा शुल्क, (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, इतर शुल्क इत्यादी.) तसेच विद्यार्थ्यांना अनुज्ञेय निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय शुल्क/भत्ते इत्यादी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्याच आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा होणे आवश्यक आहे. या करीता राज्य शासनाने PFMS या प्रणालीव्द्वारे लाभाची अदायगी करणे आवश्यक आहे. सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.२ नुसार सन २०२१–२२ पासून मंजूर झालेली शिष्यवृत्तीची रक्कम संबधित विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये DBT( Direct Benificiary Transfer) या तत्वावर जमा करण्यात यावी.

२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. १०.१ नुसार सन २०२१–२२ पासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतीवर्षी ६० % केंद्र हिस्सा व राज्य शासनाचा उर्वरित ४०% बांधील खर्च निश्चित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून राज्यातील सर्व अनूसचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजूर झालेली रक्कम खालीलप्रमाणे सुधारीत वितरण पध्दतीने अदा करण्यात येणार आहे.

## (अ) केंद्र शासनाच्या ६०% हिश्श्याचे वितरण:–

महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याचा स्कॉलरशिचा अर्ज संबधित जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे मार्फत मंजूर झाल्यानंतर त्या शैक्षणिक वर्षाची अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कम प्रणालीव्द्वारे निश्चित करण्यात येते. सदरहू मंजूर करण्यात आलेली संपूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम म्हणजेच महाविद्यालयास देय असणारा भाग (शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, व इतर नापरतावा शुल्क इ.) तसेच विद्यार्थ्याला देय असणारा भाग (निर्वाह भत्ता) या दोन्ही भागांचा एकत्रित रकमेचा केंद्र शासनाचा ६०% हिस्सा या प्रमाणात लाभाची रक्कम केंद्र शासनाच्या प्रणालीमध्ये निश्चित करण्यात येणार आहे. उपरोक्त ६०% हिस्सा विद्यार्थ्यांने महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत केलेल्या अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट शासनामार्फत DBT तत्वानुसार वितरीत करण्यात येणार आहे.

**सदरहू केंद्र शासनाचा हिस्सा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरित महाविद्यालयास देय असलेली रक्कम विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे अनिवार्य आहे. यासाठी विद्यार्थ्यांना विहित नमुन्यातील हमीपत्र द्यावे लागणार आहे याची नोंद घ्यावी.**

## (ब) राज्य शासनाच्या ४०% हिश्श्याचे वितरण:–

उपरोक्त मुद्दा क्रमांक (२) अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या एकूण मंजूर झालेल्या रकमेचा केंद्र हिस्सा ६० % वजा जाता उर्वरित राज्य हिस्सा ४०% ची रक्कम राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टल मार्फत वितरीत करण्यात येईल. सदरहू राज्य हिस्सा सन २०२०–२१ पर्यंतच्या कार्यप्रणालीनुसार DBT तत्वावर संबधित विद्यार्थ्यांचे आधार संलग्नीकृत बँक खाते व संबधित महाविद्यालयाचे बँक खात्यामध्ये थेट PFMS प्रणालीव्द्वारे मंजूर रक्कम वितरित करण्यात येईल.

तरी, वरीलप्रमाणे झालेल्या या नविन बदलाची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी व जमा झालेली शिष्यवृत्तीची रक्कम सात दिवसाच्या आत महाविद्यालयाकडे चलनानी भरावी. सदरची शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांनी खर्च करु नये ही रक्कम महाविद्यालयाची आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती विभागास संपर्क करावयाचा आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन पूर्तता करावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 18-19\Notice\Scholarship Notice New 2018-19 New.docx